आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

मंगळवार, दिनांक २५ जून २०२४

ठळक बातम्या

- लोकसभा सभापती पदासाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडून माजी सभापती ओम बिर्ला तर विरोधी पक्षांकडून काँग्रेस खासदार के.सुरेश यांचा अर्ज दाखल.
- 'विद्यार्थ्यांचा तणाव आणि समस्यांचं निराकरण करण्यासाठी एक मजबूत प्रणाली स्थापन करणार'- नीट संदर्भातील समितीचे अध्यक्ष डॉ.के.राधाकृष्णन यांचं प्रतिपादन.
- उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली पुनर्वसन आणि पुनर्स्थापना संनियंत्रण समितीची बैठक संपन्न, यवतमाळ जिल्ह्यातील अमडापूर लघु पाटबंधारे प्रकल्पातील पुनर्वसनासाठी २९ कोटी रुपयांचा निधी मंजूर.
- पंढरपूर इथं विठुरायाच्या दर्शनासाठी यवतमाळ इथून निघाली दिव्यांगांची वारी, दिव्यांग संघ आणि सेवा समर्पण प्रतिष्ठानचा राज्यातील पहिलाच उपक्रम.

*****

लोकसभा अध्यक्षपद

राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं लोकसभा सभापतीपदासाठी ओम बिर्ला यांना पुन्हा संधी दिली आहे. आज त्यांनी सभापतीपदासाठी अर्ज भरला. गेल्या लोकसभेतही ते सभापती होते. विरोधकांकडून काँग्रेस खासदार के. सुरेश यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. या पदासाठी उद्या निवडणूक होणार आहे. स्वातंत्र्यापासून आतापर्यंत लोकसभेचे सभापती एकमतानं नियुक्त झाले आहेत. यंदा दोन उमेदवार रिंगणात असल्यानं पहिल्यांदाच निवडणूक होण्याची शक्यता आहे. सभापतीपदाच्या उमेदवारावर सहमती व्हावी यासाठी सरकारनं विरोधकांशी चर्चा केली होती. केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंग आणि पीयूष गोयल यांनी काँग्रेस नेते के सी. वेणुगोपाल आणि द्रमुक नेता टी. आर. बालू यांच्याशी चर्चा केली. राजनाथ सिंग यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनाही फोन करुन सत्ताधारीपक्षाच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याची विनंती केली होती. पण विरोधकांनी उप सभापतीपदाच्या उमेदवाराचं नाव जाहीर करण्याची मागणी केली. उपसभापती

पदावरच्या उमेदवाराचं नाव योग्य वेळी जाहीर करू असं सत्ताधारी पक्षानं सांगितलं. त्यामुळं सभापतीपदाच्या उमेदवाराची नेमणूक एकमतानं करण्यावर सहमती झाली नाही. सरकारच्या लोकसभा सभापतीपदाच्या उमेदवाराला आम्ही पाठिंबा द्यायला तयार आहोत. पण सरकारनं उप सभापती पद विरोधी पक्षाला द्यावं अशी मागणी सभागृहाचं कामकाज सुरू होण्यापूर्वी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केली होती.संभापतींची निवड ही बिनविरोध व्हावी अशी अपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केली आहे. तत्पूर्वी, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवनिर्वाचित राज्यसभा सदस्य सुनेत्रा पवार यांनी आज सदस्यत्वाची शपथ घेतली. उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी पवार यांना शपथ दिली.

विदर्भ खासदार शपथ

नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी आज संसद भवनात सुरू आहे. 18 व्या लोकसभेच्या पहिल्या सत्राच्या पहिल्या दिवशी काल पंतप्रधान नरेंद्र मोदींसह २६६ सदस्यांना शपथ देण्यात आली होती. यात नागपूरचे खासदार नितीन गडकरी आणि बुलढाण्याचे खासदार प्रतापराव जाधव यांचा समावेश होता. महाराष्ट्रातील बहुतांश खासदारांनी शपथ आज घेतली. बहुतांश खासदारांनी मातृभाषा मराठीत शपथ घेतली. यात विदर्भातील वर्धा मतदार संघाचे खासदार अमर काळे, अमरावतीचे बळवंत वानखेडे, चंद्रपूरच्या खासदार प्रतिभा धानोरकर, आणि यवतमाळचे खासदार संजय देशमुख, यांचा समावेश आहे. रामटेकचे खासदार श्यामकुमार बर्वे, भंडारा-गोंदिया मतदारसंघाचे प्रशांत पडोळे, आणि अकोल्याचे अनुप धोत्रे तसंच गडचिरोलीचे डॉ. नामदेव किरसान यांनी देखील आज शपथ घेतली. याशिवाय प्रणिती शिंदे, वर्षा गायकवाड या काँग्रेसच्या खसदारांनी हातात संविधानाची प्रत घेऊन शपथ घेतली. तर ओडिशातले भाजपचे खासदार प्रताप सारंगी यांनी संस्कृतमधून शपथ घेतली. त्याचप्रमाणे आज समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी देखील हातात संविधानाची प्रत घेऊन शपथ घेतली.

दिव्यांगांची वारी

पंढरपूर इथं विठुरायाच्या दर्शनासाठी यवतमाळ इथून दिव्यांगांची वारी विठ्ठलाच्या दारी पालखी घेऊन निघाली आहे. दिव्यांग संघ आणि सेवा समर्पण प्रतिष्ठानचा राज्यातील हा पहिलाच उपक्रम आहे. मोठ्या संख्येने दृष्टिहीन वारकरी

आषाढिनिमित्त हरी नामाचा गजर करत पंढरपूर इथं चंद्रभागेच्या वाळवंटात दाखल होण्यासाठी आज अंगारकी चतुर्थीला सिद्धिविनायक मंदिरात दर्शन घेऊन निघाले. पूर्णत: दिव्यांगांची पंढरपूरात जाणारी ही महाराष्ट्रातील पहिलीच वारी आहे. दिव्यांग संघाचे अध्यक्ष प्रवीण कठाळे यांच्या मार्गदर्शनात संचालक सदानंद तायडे ह्यांनी संत सूरदास यांची प्रतिमा आणि पादूका घेवून पंढरपूरकडे प्रस्थान केलं आहे. आर्णी, दिग्रस, पुसद, कळमनुरी, परभणी, परळी, अंबेजागाई, कुर्डूवाडी, पंढरपूर असा २२ दिवस ५२१ किलोमीटरचा  हा पायदळ प्रवास करून दिव्यांग वारी पंढरपूर इथं पोहचणार आहे.

पुनर्वसन-अजित पवार

राज्याच्या विकासासाठी महत्वपूर्ण ठरलेल्या विविध प्रकल्पांतील प्रकल्पग्रस्तांसाठी उभारण्यात आलेली पुनर्वसित गावठाणे ‘आहे त्या स्थितीत’ ग्रामविकास विभागानं तातडीनं  ताब्यात घ्यावीत. या पुनर्वसित गावठाणांना पुरविण्यात येणाऱ्या १८ नागरी सुविधांसह त्यांच्या विकासासाठी आवश्यक असणारा अतिरिक्त निधी ग्रामविकास विभागाला देण्यात येईल, असा महत्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज घेतला. या निर्णयामुळे राज्यातील अनेक पुनर्वसित गावठाणांच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला असून गेल्या अनेक वर्षांचा प्रलंबित प्रश्न मार्गी लागला आहे. त्याचबरोबर दरड कोसळून तसेच भूस्खलनामुळे पूर्णपणे गाडले गेलेल्या वाड्या, वस्त्या, तांडे, पाडे, गावांतील बाधितांनासुध्दा प्रकल्पग्रस्तांचा दर्जा देण्याचा महत्वपूर्ण निर्णय आज घेण्यात आला. दरम्यान यवतमाळच्या उमरखेड तालुक्यातील अमडापूर लघु पाटबंधारे प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला पुनर्वसनाचा प्रश्न अखेर आज मार्गी लागला असून, प्रकल्पाच्या प्रलंबित पुनर्वसनासाठी २९ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

विधानपरिषद

विधान परिषदेच्या रिक्त होणाऱ्या ११ जागांसाठी आजपासून अर्ज भरायला सुरुवात झाली आहे. या निवडणुकीसाठी २ जुलै रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज सादर करता येतील.  ३ जुलै रोजी अर्जांची छाननी होईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत ५ जुलै पर्यंत आहे. १२ जुलै रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळात मतदान होईल. मनीषा कायंदे, विजय गिरकर, अब्दुल्ला दुर्राणी, निलय नाईक,

अनिल परब, रमेश पाटील, रामराव पाटील, वजाहत मिर्झा, प्रज्ञा सातव, महादेव जानकर आणि जयंत पाटील यांचा कार्यकाळ संपत असल्यानं ही निवडणूक होत आहे.

भारतीय न्याय संहिता

भारतीय न्याय संहिता १ जुलैपासून लागू होत आहे. पोलिसांना आता जुने व नवीन कायद्याचा अभ्यास करून तपास करावा लागणार आहे. त्यामुळे नवीन फौजदारी कायदे प्रत्येकाने आत्मसात करावे, असे प्रतिपादन ग्रामीण पोलीस दलातील उपविभागीय पोलीस अधिकारी बाबू रोहम यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय आणि नागपूर जिल्हा पोलिस (ग्रामीण) दल यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन फौजदारी कायदे-२०२४ या विषयावर महाविद्यालयात शनिवार, दिनांक २२ जून रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यावेळी रोहम मार्गदर्शन करीत होते.

डॉ.किशोर मानकर

'गरीबीमुळे शिक्षणापासून कुणीही वंचित राहू नये, यासाठी सतत काम करणारी आसान्या फाऊंडेशन ही गरीब वंचितांसाठी आधारवड संस्था ठरली आहे', असं प्रतिपादन मुख्य वन संरक्षक डॉ.किशोर मानकर यांनी आज नागपुरात केलं.कामठी मार्गावरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर कन्वेन्शनन सेंटर इथं आयोजित केलेल्या आर्थिक सामाजिक न्याय अर्थात आसान्या फाऊन्डेशनच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात अध्यक्ष्य स्थानावरून ते बोलत होते. मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून जीएसटीचे अतिरिक्त आयुक्त मुकुल पाटील, समाज कल्याणचे विभागाचे प्रादेशिक उपायुक्त डॉ.सिद्धार्थ गायकवाड, आसान्या फाऊंडेशचे संचालिका मोनिका निंबेकर, प्रदीप शेंडे, डॉ.सी.एन.मेश्राम प्रामुख्याने उपस्थित होते. 'समाजातील श्रीमंत लोकांनी लग्न, वाढदिवस इत्यादी वैयक्तीक समारंभाच्या खर्चातील अर्धा टक्का तरी गरीब मुलांच्या शिक्षणासाठी दान करावा,' असं आवाहन यावेळी डॉ.मानकर यांनी केलं.

नीट समिती

राष्ट्रीय चाचणी संस्थेद्वारे घेतल्या जाणाऱ्या सर्व परीक्षा पारदर्शक, निष्पक्ष आणि सुरळीतपणे पार पडाव्यात, यासाठी शिक्षण मंत्रालयाने गठीत केलेल्या उच्चस्तरीय समितीची पहिली बैठक काल झाली. विद्यार्थी आणि पालकांच्या समस्या जाणून

घेणं, हे समितीचं पहिलं प्राधान्य असून, त्यासाठी त्यांच्याशी संवाद साधला जाईल, असं समितीचे अध्यक्ष डॉ. के. राधाकृष्णन यांनी नवी दिल्ली इथं बातमीदारांना सांगितलं. विद्यार्थ्यांचा तणाव आणि समस्यांचं निराकरण करण्यासाठी एक मजबूत प्रणाली स्थापन करण्याचा समितीचा विचार असल्याचं ते यावेळी म्हणाले. राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या परीक्षा पद्धतीत सुधारणा सुचवण्यासाठी केंद्र सरकारनं इस्रोचे माजी अध्यक्ष डॉ.के.राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन केली आहे. परीक्षेतल्या गैरव्यवहारांना आळा घालून कार्यक्षमता सुधारणं, सुरक्षेच्या नियमावलीत सुधारणा, तसंच संस्थेची रचना आणि कार्यपद्धतीचं पुनरावलोकन करण्याची शिफारस करण्यासाठी ही समिती गठीत करण्यात आली आहे.

नीट-युजी-सीबीआय

नीट-युजी प्रवेश परीक्षेतल्या गैरप्रकाराची चौकशी करण्यासाठी सीबीआयनं बिहार, गुजरात आणि राजस्थानमधली ५ प्रकरणं हाती घेतली आहेत. सीबीआयनं गुजरात आणि बिहारमध्ये प्रत्येकी एक, तर राजस्थानमध्ये ३ प्रकरणं हाती घेतली असून, महाराष्ट्रातल्या लातूरमधल्या प्रकरणाची चौकशी सीबीआयद्वारे होण्याची शक्यता आहे. बिहार पोलिसांनी दाखल केलेला **FIR** पेपरफुटी प्रकरणी असून, इतर ४ प्रकरणं तोतया उमेदवार, तसंच उमेदवार, स्थानिक अधिकारी आणि निरीक्षकांचा समावेश असलेल्या फसवणुकीची असल्याचं ते म्हणाले.

आणीबाणी

आणीबाणीचा विरोध आणि प्रतिकार करणार्या सर्व महान स्त्री - पुरुषांना आंदरांजली वाहण्याचा आजचा दिवस असल्याचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. देशावर आणीबाणी लादून काँग्रेस पक्षाने मुलभूत स्वातंत्र्यांना तसंच प्रत्येक भारतीयात आदराचं स्थान असलेल्या भारतीय संविधानाला पायदळी तुडवलं, अशा भावना पंतप्रधानांनी आणीबाणीच्या आठवणी जागवताना समाज माध्यमावरच्या संदेशात व्यक्त केल्या आहेत. २५ जून १९७५ रोजी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी जाहीर केली होती.

******